



## प्रस्ताविक

ह.भ.प. दासगणू महाराजांनी १९०३ साली बाबांच्या आशीर्वादाने गुरुपाठाच्या २५ अभंगांची प्रासादिक रचना केली आहे. साईभक्तांना नित्य उपासना करतांना त्याचा उपयोग हरिपाठासारखा व्हावा हा त्या मागचा उद्देश असावा. बाबा हयात असतांना मारुती मंदिर, विठ्ठल मंदिर, द्वारकामाई व चावडीत हे अभंग शिर्डीकर साईभक्त म्हणत असत.

आज अनेक शहरांतून बाबांची मंदिरे आहेत. तसेच पुष्कळ भाविक बाबांची पालखी घेऊन शिर्डीची पायी-वारी करतात. त्यांना रस्त्याने सकाळी व संध्याकाळी पालखीसमोर श्रीसाईसच्चरित पारायण करतांना रोज पारायणापूर्वी हे अभंग अत्यंत उपयुक्त आहेत. सर्व भक्तांना त्याचा अवश्य फायदा होईल अशी आशा आहे.

प्रकाशक

| | | |
|---|---|---|
| प्रकाशक | – | अध्यक्ष<br>श्री साईबाबा संस्था ट्रस्ट, शिर्डी |
| मुद्रक | – | लोकमंगल प्रिंट एन पॅक लि.<br>१२२, इंडस्ट्रियल इस्टेट, होटगी रोड, सोलापूर – ४१३ ००३ |
| आवृत्ती | – | तृतीय आवृत्ती |
| सन | – | २०१२ |
| प्रती | – | ३००० |
| मूल्य | – | रु. ३/– |

***

# गुरुपाठाचे अभंग

## जयाची ती रूपे सगुण निर्गुण। ऐसा नारायण वंदू आधी ॥

सगुण सेवितां निर्गुण ये हाती । निर्गुणाची प्राप्ती आरंभी ना ॥
आधि मूल काढी क, ख, बाराखडी। मग शब्द जोडी झाल्या ज्ञान ॥
गणु म्हणे तैसी सगुणोपासना। बाराखडी जाणा अध्यात्माची ॥१ ॥

ती ही बाराखडी शिकवी जो गुरू। भवाब्धीचें तारूं तोच जाणा ॥
गुरुसेवा हीच प्रथम पायरी। असे टिकण्या भारी अवघड ॥
सद्गुरूरायाची कृपा संपादितां। सेवेची पूर्तता सहज होई ॥
गणु म्हणे केल्या प्रसन्न सविता। प्रभेची न्यूनता केविं पडे ॥२ ॥

सद्गुरूची सेवा बहुतांनीं केली। ऐसी साक्ष दिधली पुराणांनी ॥
पूर्णब्रह्म राम जानकीचा कान्त। झाला शरणागत वसिष्ठांसी ॥
रूक्मिणीवल्लभें केला सांदीपनी। आपणालागुनी गुरुराय ॥
गणु म्हणे गुरुवांचूनिया नर। तोचि जाणा खर दो पायांचा ॥३ ॥

निष्ठावंत भाव हाच देतो फळ। अभक्तिचा मळ निमालीया ।।
चहाड -दुतोंड्या ऐसा नारद मुनी। परि झाला तरणी प्रल्हादातें ।।
गोपिचंदें गुरू लिदीसी गाडीला। पुढें तोचि झाला वंद्य त्यातें ।।
गणु म्हणे सोनें चढे मोला अंगें। कसोटीच्या संगें जगामाजीं ।।४ ।।

क्षमा, शांती, दया, असे जया ठायीं। तैसें ज्ञान पाही संपूर्ण तें ।।
जयाचियें शिरी ईश्वराचा हात। तोच सद्गुरूनाथ करावा हो ।।
बाहेरील सोंगा भुलूं नका कदा। पतंगातें दगा दीपापाशीं ।।
गणु म्हणे हंस पाण्यातें टाकूनी। घेतसे शोधोनी जैसें दूध ।।५ ।।

हिरे आणि गारा एक्याच खाणीत। तैसे बध्द-मुक्त जगामाजीं ।।
पारखी तो येतां हिरा घे वेंचोंनी। कुक्कूट पायांनी कालवी तो ।।
मुमुक्षु पारखी चार्वाक कोंबडा। कुक्कूटा उकिरडा गोड वाटे ।।
गणु म्हणे जो कां असे भाग्यवंत। तयाचाच हेत गुरूपायी ।।६ ।।

5

क्षमाशांतीयुक्त भवाब्धीचें जहाज। ऐसा सद्गुरूराज शिर्डीमाजी ।।
नामाभिधा जयाची शोभे बाबा सांई। अनाथांची माई तीच जाणा ।।
अनाथ सनाथ हा न भेद जेथें। सूर्यप्रकाशातें निवड कैची ।।
माझा गुरूराज जान्हवीचें जळ। गणु अर्पी भाळ तया पायी ।।७ ।।

अंगकाठी उंच केलीसे धारण। कळवावया खूण भक्तजनां ।।
उच्च ज्ञान जें कां अध्यात्म साजिरें। तेंचि सेवा सारें कल्याणार्थ ।।
परि नका सोडूं ठेंगणी लीनता। न ये थोर होतां बाल्यावीण ।।
गणु म्हणे वर्ण तांबूस सावळा। सद्गुरूची लीला अगाधचि ।।८ ।।

सद्गुरुरायानें जला तेल केलें। दीप उजळीले लक्षावधी ।।
ठेवुनिया दीप उशापायथ्याशीं। पहुडे फळीसी गुरुमुर्ती ।।
त्यांच्या त्या कृतीचा हाच आहे अर्थ। कदा अंधारांत निजूं नये ।।
गणु म्हणे माया दुर्धर अंधार। ज्ञानदीप थोर म्हणुनी लावा ।।९ ।।

शिवविष्णूब्रह्मरूप बाबा सांई । भाव दुजा कांही मानूं नका ॥
सद्गुरूरायाच्या पायाची जी धूळ । तेच गंगाजळ शुद्ध माना ॥
अमृता आगळीं मुखीचीं वचनें । तींच मानामनें गीता जेवी ॥
गणु म्हणे बाबा वसंत सोज्ज्वळ । भक्तांनो कोकीळ व्हा रे तुम्ही ॥ १० ॥

परमार्थाची आस ज्यास मनापून । त्याने हे चरण पहावें आधीं ॥
ऐहिक सुखाशी देवोनीया फांटा । भक्तीच्या त्या वाटा धुंडाळाव्या ॥
द्वेषाचे सराटे फेकूनीयां द्यावे । सांईमय पहावे जगालागीं ॥
गणु म्हणे तरी तुम्ही त्यांचे भक्त । शोभाल जगांत सज्जनांनो ॥ ११ ॥

शिर्डीक्षेत्र नोहे पचंबा बाजार । तेथे दुकानदार परमार्थाचा ॥
ऐहिक सुखाचीं खेळणीं बाहुल्या । समूळ फेकिल्या गुरुरायें ॥
कां की तयामाजी किमपि ना अर्थ । फसतील व्यर्थ पोरें माझी ॥
गणु म्हणे पोर पंचब्यासी जातें । किरकिरेंच घेतें आवडीनें ॥ १२ ॥

कर्म भक्ती ज्ञान बाजारी या माल । मनिं जो वाटेल तोचि घ्यावा ॥
तिघांची किंमत एक आहे जाणा । फळहि तिघांना एकची हो ॥
भावरूपी द्रव्य पाहिजे तयासी । सांई सद्गुरूसी दुजे न लगे ॥
गणु म्हणे भाव-नाणें जयापाशीं । त्याने बाजाराशीं येथें जावें ॥१३ ॥

फळ तें पाथेय, घ्यावे फराळाशीं । मग पंढरीसी जावें सुखें ॥
बाबाजीनें कृपा तुकोबासी केली । तयिंच फळली पंढरी त्या ॥
थापटणे गोऱ्यानें मारूनि नाम्याला । कच्चा ठरविला देवापुढें ॥
गणू म्हणे मग खेचर माऊली । नाम्याने वंदीली कल्याणार्थ ॥१४ ॥

निवृत्ती ज्ञानेश ईश्वरी अवतार । परी गुरूवर गहिनी केला ॥
गुरूकृपेंवीण एकालाही जनीं । विठू चक्रपाणी भेटला ना ॥
पंढरीरायाची मनिं असल्या आस । सद्गुरूची कास दृढ धरा ॥
गणु म्हणे तया भवाचें ना भय । ज्याचे चित्तीं पाय सद्गुरूचे ॥१५ ॥

शुकसनकादि नारद अंबरीष । निवृत्ती ज्ञानेश नामा तुका ।।
दास तुलसी चोखा जयदेव सांवता । पंत नाथ मेहेता कबीर तो ।।
बोधला पवार विसोबा खेचर । गोरोबा कुंभार कूर्मदास ।।
गणु म्हणे त्याच कोटींतला सांई । चला त्याच्या पायीं लीन होऊं ।।१६ ।।

जरि त्या संतांच्या मूर्ती हो लोपल्या । सांईरूपें उरल्या पहावया
त्रिभुवनामाजीं जे जे कोणी संत । ते ते सांईनाथ मजलागीं ।।
भेदबुध्दी नुपजो माझी संतांठायीं । संत शेषशायी प्रत्यक्षची ।।
गणुदास आहे संतांचा अंकीत । भेटो पंढरीनाथ त्यांच्या कृपें ।।१७ ।।

भक्तीरुप गंगा आहे जया ठायीं । तेथें माझा सांई राहे उभा ।।
हस्तसंकेतानें पालवीतो लोकां । या हो फिरूं नका रानोमाळ ।।
मज ओळखावें आहे मी कोठला । कशासाठीं आला शिरडीसीं ।।
पंढरी क्षेत्रींचा मीच हो वाटाड्या । गणूच्या त्या उड्या सांईबळें ।।१८ ।।

7

मज न विचारितां पंढरीच्या वाटे । जाल तरी कांटे रूततील ।।
पंढरीची वाट मोठी अवघड । मोठे मोठे पहाड मार्गामाजीं ।
तयाचें तें वज्र आहे मजपाशीं । तसा हृषीकेशी ओळखीचा ।।
गणु म्हणे जन्मोजन्मीं नाही तूटी । सांईच्या जगजेठी हृदयांत ।।१९ ।।

म्हणून ही संधी दवडुं नका कोणी । पडाल मागूनी पस्ताव्यांत ।।
दंभाचे गाठोडें एकीकडे ठेवा । विकल्प सोडावा घातक जो ।।
क्रोधाची ती होळी ज्ञानाग्नीनें करा । वासनेसी मारा अभ्यासानें ।।
गणु म्हणे ऐशा व्रतासी जो पाळी । तयासी सांभाळी सांई माझा ।।२० ।।

करूं नका नाश या आयुष्याचा । जन्म मानवाचा पुन्हां नाहीं ।।
प्रत्येक जन्मांत कन्या पोरे घर । मैथुन आहार आणि निद्रा ।।
नरजन्म नाहीं ऐशा कृत्यासाठीं । बांधा खूणगांठी मनामाजीं ।।
जोडूं जातां जोडे जन्मी या ईश्वर । नरजन्म थोर गणु म्हणे ।।२१ ।।

लोभ मोह माया टाकून अवघ्यांची । धरा सद्गुरूचीं पाऊलें तीं ॥
गुरूपायामार्जी आहे सर्व कांहीं । गुरूवीण नाहीं सार्थकता ॥
गुरू कामधेनू गुरू कल्पकता । चिंतेसी वारिता चिंतामणी ॥
गुरूभक्तीठायीं जो कां एकनिष्ठ । त्रिलोकी तो श्रेष्ठ गणु म्हणे ॥२२॥

गुरूपदी भाव विदूसी अबोला । ऐशा मानवाला मोक्ष नोहे ॥
भोपळा हातांत परि धोंडा कंठी । बांधिल्या शेवटी घात घडे ॥

गुरूरूपी देह आत्मा पांडुरंग । केल्या येई रंग एक्या ठायीं ॥
एक्या अव्हेरितां एक न ये हातां । दोघांची योग्यता सारखीच ॥

गुरू आणि देव यांत केल्या तूटी । दुःखाची नरोटी येईल हातां ॥
गणु म्हणे राहा सावध यासाठीं । गुरू जगजेठी एकरूप ॥२३॥

9

सांईबाबा आणि सद्गुरू वामन । हे न दोघे भिन्न एकरूप ॥
भाव साधकांनो ठेवा दोघांपायीं । परि विठाबाई गावी वाचे ॥
सांई - वामनाचें करावें पूजन । राखावा सन्मान भूपतीचा ॥
परमार्थांत भक्ती व्यवहारीं नीती । संसारी विरक्ती गुण म्हणे ॥ २४ ॥

गुरूपाठाचे हे अभंग पंचवीस । जपतां होय नाश पातकांचा ॥
गुरूचे पवाडे गातां मोक्ष लाभे । नका मरूं दंभे निरर्थक ॥
सांईमहाराजांचा धरूनीया हात । तरा भवाब्धींत बुडूं नका ॥
सांईच्या इच्छेनें होतें अवघें कांहीं । गणूकडे नाहीं बोल त्याचा ॥ २५ ॥



## प्रार्थनाष्टक

किती घेऊं हे जन्म कोट्यानुकोटी । क्षमाशांतीचा तो नसे लेश पोटीं ।।
असे राहिला व्यापुनी मोह चित्ता । मला यांतुनी सोडवी सांईनाथा ।।१।।
शिवाच्या भयें काम जो कां पळाला । छळाया आम्हां वाटतें येथ आला ।।
पिनाकीपरी होउनी तूं समर्था। मला यांतुनी सोडवी सांईनाथा ।।२।।
दुराशा मज नाचवी ठायिं ठायीं । म्हणूनी मना स्थिरता होत नाही ।।
तुझे पाय त्यातें सदूपाय आतां । मला यांतुनी सोडवी सांईनाथा ।।३।।
भवाचें मला प्रेम तें फार लोटे । जसा गर्दभा केर तो गोड वाटे ।।
बुडालों भवी शीघ्र देऊनि हाता । मला यांतुनी सोडवी सांईनाथा ।।४।।
क्षमा शांतिचें भातुकें दे दिनासी । जसें नेणत्या लेंकरा माय पोशी ।।
नितीची घुटी पाजवी हे समर्था । नमस्कार माझा तुला सांईनाथा ।।५।।
सदा सर्वदा चित्त सानंद ठेवी। कदा वासनेच्या न पाशांत गोंवी ।।
जगी आमुतें तूं पिता माय त्राता । नमस्कार माझा तुला सांईनाथा ।।६।।
कशामाजिं तें हीत माझें कळेना । कळे जें मना तेंच त्यासी वळेना ।।
असा जाहलों त्राहि त्राहि समर्था। नमस्कार माझा तुला सांईनाथा ।।७।।
तुला योग्य वाटेल तें त्वां करावें । शिशूनें पित्याला कसें शिकवावें ।।
गणूची सदा वाहि चित्तांत चिंता । नमस्कार माझा तुला सांईनाथा ।।८।।

।। ॐ श्री साईनाथाय नम: ।।

## श्री सद्गुरूसाईबाबांचे भक्तांना अभय

शिरडीस ज्याचे लागतील पाय । टळती अपाय सर्व त्याचे ।१।
माझ्या समाधीची पायरी चढेल । दु:ख हे हरेल सर्व त्याचे ।२।
जरी हे शरीर गेलो मी टाकून । तरी मी धावेन भक्तांसाठी ।३।
नवसास माझी पावेल समाधी । धरा दृढ बुध्दी माझ्या ठायी ।४।
नित्य मी जिवंत, जाणा हेचि सत्य। नित्य घ्या प्रचित अनुभवे ।५।
शरण मज आला, आणि वाया गेला। दाखवा दाखवा ऐसा कोणी ।६।
जो जो, मज भजे, जैशा जैशा भावे । तैसा तैसा पावें, मीही त्यासी ।७।
तुमचा मी भार वाहीन सर्वथा। नव्हे हे अन्यथा वचन माझे ।८।
जाणा येथे आहे सहाय्य सर्वास । मागे जे जे त्यास ते ते लाभे ।९।
माझा जो जाहला काया-वाचा-मनी । तयाचा मी ऋणी सर्वकाळ ।१०।
साई म्हणे तोचि, तोचि झाला धन्य । झाला जो अनन्य माझ्या पायी ।११।

• • •

अनन्त कोटी ब्रह्मांण्ड नायक । राजाधिराज योगीराज परब्रह्म
**श्री सच्चिदानंद सद्गुरू साईनाथ महाराज की जय ।।**

# पसायदान



आता विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें
तोषोनि मज द्यावें । पसायदान हे ॥ १ ॥

जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।
भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें ॥ २ ॥

दुरितांचे तिमिर जावो । विश्वस्वधर्मसूर्ये पाहो ।
जो जें वांछील तो ते लाहो । प्राणिजात ॥ ३ ॥

वर्षत सकळमंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां ॥ ४ ॥

चला कल्पतरुचे आरव । चेतनाचिंतामणीचें गांव ।
बोलते जे अर्णव । पीयूषांचे ॥ ५ ॥

चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥ ६ ॥

किंबहुना सर्वसुखीं । पुर्ण होऊनि तिहीं लोकीं ।
भजिजो आदिपुरूखी । अखंडित ॥ ७ ॥

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इयें ।
दृष्टादृष्टविजयें । होवावें जी ॥ ८ ॥

येथ म्हणे श्री विश्वेशरावो । हा होईल दानपसावो ।
येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया झाला ॥ ९ ॥

## भजने

१) साईनाथ गुरु माझे आई, मजला ठाव द्यावा पायीं ॥

२) दत्तराज गुरु माझे आई, मजला ठाव द्यावा पायीं ॥

३) सद्गुरुनाथ सांईनाथ, मी अपराधी घ्या पदरांत ॥

४) मार्गी हळू हळू चाला। मुखानें सांईनाथ बोला ॥

५) सांई माझा ज्ञानेश्वर। महाविष्णूचा अवतार ॥

६) गगनांत तारका, शिरडींत द्वारका। साईसारखा, देव नाहीं, देव नाहीं ॥

**ॐ सांई, श्री सांई, जय जय सांई !**